MHWS100001222000

**सं.फौ.ख.क्र. ५९१/२०००**
**सरकार वि. बावि रेड्डी**

**निशाणी क्रमांक ०१ वर आदेश**

(दिनांक १५/०४/२०२६)

सदरचा खटला सुप्त प्रकरणावर प्रलंबित आहे. आरोपी बावी रेड्डी वय्यबी व्यंकटेश्वरा याच्याविरुध्द वेळोवेळी गैरजमानती अधिपत्र काढण्यात आलेले आहेत. माझ्या पुर्व पिठासिन अधिकाऱ्यांनी आरोपीविरुध्द कायद्याप्रमाणे सर्व बाबींची पुर्तता केलेली आहे. अभियोगपक्षाला वारंवार संधी देवून सुद्धा अभियोगपक्षाने आरोपीला न्यायालयासमक्ष हजर केलेले नाही.

२. सदरच्या खटल्यात अभियोगपक्षाने आरोपीला न्यायालयासमक्ष हजर केलेले नाही म्हणून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २९९ अन्वये साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आलेली आहे.

३. सहाय्यक सरकारी अभियोक्ता सौ.एम.एस.सुपारे यांना ऐकन्यात आले.

४. आरोपीविरुध्द गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षातर्फे एकुण ०२ साक्षीदार तपासण्यात आलेले आहेत. साक्षीदार क्र.१ बाळु उर्फ सुहास मनोहर पिंपळकर व साक्षीदार क्र. २ प्रमिला माणिक पिंपळकर यांची साक्ष अनुक्रमे नि.क्र. ०५ व ०८ वर नोंदविण्यात आलेली आहे.

५. साक्षीदार क्र.१ बाळु उर्फ सुहास पिंपळकर व साक्षीदार क्र.२ प्रमिला पिंपळकर यांनी त्यांच्या सरतपासणीत असे कथन केले आहे की, ते आरोपी व फिर्यादी यांना ओळखत नाही. साक्षीदार क्र.१ बाळु ऊर्फ सुहास याने पुढे असे कथन केले आहे की, मयत माणिक पिंपळकर हा त्याचा काका होता. साक्षीदार क्र.२ प्रमिला हिने पुढे असे कथन केले आहे की, मयत माणिक पिंपळकर हा तिचा पती होता. सदर साक्षीदारांनी पुढे असे कथन केले आहे की, कथीत घटना कधी घडली होती, कुठे घडली होती व काय घडली होती याबाबत त्यांना काहीही माहित नाही. सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहकार्य केलेले नाही म्हणून सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना सदर साक्षीदारांची उलटतपासणी घेण्याची परवानगी देण्यात आली, परंतु सदर साक्षीदारांनी उलटतपासात विचारण्यात आलेल्या सर्व सूचक प्रश्नांची नकारार्थी उत्तरे दिली. सदर साक्षीदारांचा आरोपीच्या विधीज्ञांमार्फत उलटतपास आरोपीच्या हजेरीपर्यंत तहकुब करण्यात आलेला आहे. सदर साक्षीदारांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता माझ्या असे निदर्शनास येते की, सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षास कोणत्याही प्रकारे सहकार्य केलेले नाही. सदर साक्षीदारांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे सुद्धा निदर्शनास येते की, सदर साक्षीदारांनी त्यांच्या पुराव्यात आरोपीविरुद्ध काहीही कथन केलेले नाही. सबब, सदरील कारणास्तव सदर साक्षीदारांची साक्ष ग्राह्य धरता येत नाही.

६. अभिलेखाची पडताळणी केली असता माझ्या असे निदर्शनास येते की, सदर खटल्यातील साक्षीदार हरिदास प्रल्हाद पिंपळकर याला साक्ष समन्स काढण्यात आले होते. साक्षीदार हरिदास मरण पावल्याबाबतचा अहवाल पोलिस अधिकाऱ्यांनी साक्ष समन्स नि. क्र. ०६ अभिलेखावर दाखल केलेला आहे. पोलिस अधिकाऱ्यांनी साक्ष समन्स नि. क्र. ०६ सोबत साक्षीदार मयत हरिदास याच्या मुत्यु प्रमाणपत्राची छांयाकित प्रत नि. क्र. ०७ अभिलेखावर दाखल केली आहे. अभिलेखावरुन असे निर्दशनास येते की, सदर खटल्यातील साक्षीदार हरिदास मरण पावलेला आहे.

७. अभिलेखाची पडताळणी केली असता माझ्या असे निर्दशनास येते की, अभियोगपक्षास वारंवार संधी देवुन सुध्दा अभियोगपक्षाने सदरील खटल्यातील फिर्यादीची साक्ष नोंदविलेली नाही, सबब, सदर खटल्यातील जबानी रिपोर्ट व छापील प्रथम खबरी अहवाल तसेच त्यातील मजकुर सिध्द झालेला नाही.

८. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादीची साक्ष महत्वाची होती परंतु सदरील खटल्यात अभियोगपक्षाने फिर्यादीची साक्ष नोंदविलेली नाही, सबब, सदर खटल्यातील जबानी रिपोर्ट व छापील प्रथम खबरी अहवाल तसेच त्यातील मजकुर सिध्द झालेला नाही. साक्षीदार क्र.१ बाळु उर्फ सुहास व साक्षीदार क्र. २ प्रमिला यांनी अभियोगपक्षास कोणत्याही प्रकारे सहकार्य केलेले नाही. सदर खटल्यातील साक्षीदार हरिदास मयत आहे. एकंदरीत अभिलेखावर उपलब्ध असलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता माझे असे निदर्शनास येते की, आरोपीने गुन्हा केला याबाबत इतर कोणताही कागदोपत्री किंवा तोंडी पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सबब, सदरचा खटला प्रलंबित ठेवण्यात काहीही अर्थ नाही कारण आरोपी फरार असून सदरचा खटला खूप जूना आहे. करिता अभियोगपक्षाने सादर केलेला पुरावा आरोपीविरुध्द कोणताही गुन्हा सिध्द करण्यास पात्र नाही, त्यामुळे आरोपी सुटण्यास (discharge) पात्र आहे. आरोपीविरुध्द काढण्यात आलेले स्टॅन्डींग अधिपत्र परत बोलविण्यात यावे. वरील सर्व विवेचनावरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपीची भारतीय दंड विधान, १८६० च्या कलम २७९, ३३७ व ३०४–अ नुसार शिक्षा पात्र असलेल्या गुन्ह्याच्या आरोपातून सुटका (discharge) करण्यात येत आहे.

२. आरोपीविरुध्द काढण्यात आलेले स्टॅन्डींग अधिपत्र परत बोलविण्यात यावे.

[न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.]

Digitally signed by MOHMAD WASIM AKRAM MOHMAD JALAL SHEAIKH
Date: 2026.04.15 17:54:27 +0530

दिनांकः– १५/०४/२०२६.

मोहम्मद वसिम अक्रम
पि.मोहम्मद जलाल शेख
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(कोर्ट क्र.१), मालेगांव.

**CERTIFICATE**

**I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.**

| | |
|---|---|
| Name of Stenographer | C. R. Lande (Grade III ) |
| Name of Court | **Shri. M. W. A. M. J. Sheaikh,**<br>C.J.J.D. & J.M.F.C., (Court No.1), Malegaon, Distt. Washim. |
| Date of Dictation | 15/04/2026 |
| Judgment/Order signed by the PO on | 15/04/2026 |
| Judgment /Order uploaded on | 15/04/2026 |